# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि.,गौतमनगर

पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर,

पिन कोड -४२३६०२

फोन नं.(०२४२३) - २६१२१० ते २६१२१५,

Email :ksksk1953@gmail.com www.karmaveerkalesugar.com


SUGAR & Distillery

जा.क्र. 1865 **टेंडर नोटीस (परिपत्रक)** दि. 7 OCT 2023

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि.,गौतमनगरच्या **२०२३-२४** गळीत हंगामाची खालीलप्रमाणे कामे कंत्राटी पध्दतीने दयावयाची आहेत. त्यासाठी अनुभव असलेल्या कंत्राटदारांनी त्यांचे पूर्वानुभवाच्या दाखल्यासह **शनिवार, दिनांक १४/१०/२०२३ रोजी सायंकाळी ५=०० वाजेपर्यंत अगर तत्पूर्वी** कारखान्याचे जनरल ऑफिसमध्ये मिळतील अशा बेताने अर्ज सिलबंद पाकिटातून दयावेत.

**१. शेण गोळा करुन मालकी हक्काने घेऊन जाणे--**

कारखान्याचे पाटाचे पलीकडील टायर बैलगाडी केन गाडीतळ व टायर बैलगाडीचे ऊस तोडणी मजूरांचे राहण्याचे जागेवरील तसेच वजन काटयावरील पडणारे शेण स्वत:चे मजूराकरवी गोळा करुन, स्वत:चे वाहनाने वाहून, मालकी हक्काने घेऊन जाणे (संपुर्ण हंगामा करीता एकत्रित दर देणे )

**(संपर्क :- शेतकी अधिकारी)**

**२. ऊस बांडया उष्टावळ चारा --**

गाडीतळावरील ऊस बांडया उष्टावळीचा चारा स्वत:चे मजुरांकरवी गोळा करून स्वत:चे वाहनाने मालकी हक्काने घेऊन जाणे. (संपूर्ण हंगामाकरीता) दरमहाचा दर देणे. **(संपर्क :- शेतकी अधिकारी)**

**३. कारखान्याचे केनयार्डाचे गव्हाणीवर प्रत्येक शिफ्टला ट्रक, ट्रॅक्टर व जुगाडास वायररोप /साखळया अनलोडरला अडकविणे व गव्हाणीच्या आणि टिल्टींग टेबलचे आसपासचे ऊसाची टिपरी गोळा करणे व गव्हाणी जवळील आणि काटयावरील साफसफाई करण्यासाठी उक्ते काम.**

वजन काटा व केनयार्ड गेट ते गव्हाणी पर्यत पडलेली ऊसाची टिपरी उचलणे व गव्हाणी जवळील जागेची साफसफाई करणे, तसेच टिल्टींग टेबलवर गाडी खाली/रिकामी करतांना टिल्टींग टेबल वरील, साईडचे व टिल्टींग टेबल खालील पडलेली ऊसाची टिपरी उचलून गव्हाणीत टाकणे, टिल्टींग टेबलची साफसफाई करणे. तसेच क्लिनींगचे दिवशी काटा प्लॅटफॉर्मखालील पिटमधील साफसफाई करणे व रोज सकाळी व संध्याकाळी सर्व वजन काटा प्लॅटफॉर्म खरडून साफसफाई करणे. तसेच ट्रक, ट्रॅक्टर व जुगाडास वायररोप/साखळ्या अनलोडरला शिफ्टप्रमाणे अडकविण्यासाठी प्र.मे.टन दर देणे.

**(संपर्क :- शेतकी अधिकारी)**

**४. अ) प्रेसमड वाहतूक कंपोस्ट प्रकल्पापर्यंत करणे--**

कारखान्याचे ऑलिव्हर फिल्टर ते कोळगांवमाळ, ता.सिन्नर शिवारातील कारखाना कंपोस्ट प्रकल्पापर्यंत आवश्यकतेप्रमाणे प्रेसमड वाहतूक करणे. कर्मवीर बायोअर्थ कंपोस्ट खताकरिता आवश्यक प्रेसमड कंपोस्ट प्रकल्पाचे आर.सी.सी. यार्डपर्यंत वाहतूक करुन १ X १.५ X ३.० मीटर आकाराच्या विंड्रोज करुन देणे. (प्र.मे.टन दर देणे.) **(संपर्क :- शेतकी व ऊस विकास अधिकारी )**

४. **ब) प्रेसमड वाहतूक गटवार ऊस उत्पादक शेतक-यांचे शेताच्या बांधापर्यंत पोहोच करणे.**

कारखान्याचे ऑलिव्हर फिल्टर ते कारखाना कार्यक्षेत्रात गटवार गांववार शेतक-यांचे शेताच्या बांधापर्यंत प्रेसमड वाहतूक करणे व खाली करणे. (वजन कमीत कमी प्रति ट्रक १० मे.टनासाठी ) कारखान्याचे नियोजनानुसार शेतकी व ऊस विकास खात्याचे सुचनेनुसार प्रेसमड वाहतूक करणे.

**(संपर्क :- शेतकी व ऊस विकास अधिकारी )**

**खालील स्टेजेसनुसार प्रति टनाचे दर देणे.**

| अ.न | स्टेजेस (अंतर) | दर प्रति टन रुपये |
|---|---|---|
| १. | ० ते ८ किलोमीटर | |
| २. | ९ ते १६ किलोमीटर | |
| ३. | १७ ते २४ किलोमीटर | |
| ४. | २५ ते ३३ किलोमीटर | |
| ५. | ३४ ते ४० किलोमीटर | |
| ६. | ४१ ते ४८ किलोमीटर | |

<u>टिप:--</u>

१) प्रेसमड शेतक-यांच्या शेताच्या बांधापर्यंत वाहतूक करुन टाकणेकामी आवश्यकतेनुसार ट्रकचा पुरवठा करणे.

२) प्रेसमड वाहतूक गांवाचे अंतर हे कारखान्याच्या ऊस वाहतूक ट्रकचे अंतराप्रमाणे राहील.

३) ऑलिव्हर फिल्टरमधून निघणारे प्रेसमड नियमितपणे त्वरीत उचलणे.

४) ऑलिव्हर फिल्टरमधून निघणारे प्रेसमड ट्रक भरुन खाली पडल्यास स्वतः उचलून ते ट्रकमध्ये भरणे.

५) प्रेसमड वाहतुकीचे काम हंगाम चालू असेपर्यंत २४ तास रात्रंदिवस करावे लागेल.

६) रिकाम्या ट्रक वाहतूक अंतरासाठी चार्जेस दिले जाणार नाही.

७) प्रेसमड शेतक-यांच्या शेताच्या बांधापर्यंत खाली केल्यानंतर शेतक-यांची सही गेटपासवर घेणे आवश्यक राहील.

८) वरील सर्व कामे कारखाना गेट बाहेरील असल्याने इतर शासकीय पुर्ततेची जबाबदारी संबंधित कंत्राटदार यांचेवर राहील.

५. **कारखाना डिस्टिलरी विभागाचे लगून नं.५ वरील राखणदारी व देखरेखीचे उक्ते कामाचे टेंडर प्रति दिवसाचा दर देणे.** **(संपर्क :- पर्यावरण अधिकारी, डिस्टिलरी विभाग )**

६. **डिस्टिलरी विभागामार्फत सुरेगांव, शहाजापूर, विघनवाडी,शहा, झापेवाडी व कोळगांवमाळ परिसरातील शेतक-यांना पिण्याचे पाणी पुरविणेसाठी ट्रॅक्टर भाडे तत्वावर पुरविणेकरीता दोन ट्रॅक्टरचे प्रति ट्रिपप्रमाणे दर देणे (प्रति ट्रॅक्टर प्रतिदिन तीन ट्रीप्स बंधनकारक आहेत.)**

**(संपर्क :- पर्यावरण अधिकारी, डिस्टिलरी विभाग )**

त्याकरिता २ ट्रॅक्टरचे प्रति ट्रिपप्रमाणे दर देणे. (प्रति ट्रॅक्टर प्रतिदिन ३ ट्रिप्स पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहील.)

७. **जनरल स्टोअर्सचे लोडींग / अनलोडींगचे काम** **(संपर्क :-स्टोअर किपर)**

सोबतचे टेंडर फॉर्ममधील तपशिलाप्रमाणे कारखान्याचे साखर विभागाकडे येणा-या मालाचे चढाई व उतराईचे कामाचा प्रति दिवसाचा उक्ता दर देणे.

८. **साखर गोण्या रिप्रोसेसिंग करणे.** **(संपर्क :-चिफ केमिस्ट)**

रिप्रोसेसिंगच्या गोण्या हातगाडीने नेऊन मॅग्मामिक्चरमध्ये टाकणे.

(५० कि.ग्रॅम भरतीचे प्रती १०० गोणीचा दर देणे.)

९. **शिलाई यंत्राच्या सहाय्याने साखर गोणी शिलाई करणे.** **(संपर्क :-चिफ केमिस्ट)**
(५० कि.ग्रॅम भरतीचे प्रती १०० गोणीचा दर देणे.)

**(संपर्क :-चिफ केमिस्ट)**

१०. मॅन्युफॅक्चरींग विभागाकडील--

१) चुना घाणीमध्ये २४ तास प्रोसेसला लागणारा चुना तयार करणे.

२) इफ्ल्युएंट वॉटरमध्ये गरजेनुसार चुना तयार करून सोडणे.

३) गंधक गोण्यात भरून सदरील भरलेल्या गोण्या गंधक भट्टीजवळ आणून ठेवणे.

४) रिकाम्या झालेल्या चुन्याच्या अथवा गंधकाच्या गोण्यांचे बंडल बांधून मॅन्युफॅक्चरिंग विभाग सांगेल त्या ठिकाणी ठेवणे.

५) चुन्याची ग्रीट व चुन्याचे जाळीवरील ग्रीट कारखान्याचे ट्रॅक्टरने स्क्रॅप यार्डात वाहतूक करुन टाकणे.

(वरील एकूण ५ कामाचा २४ तासाचा एकत्रित दर देणे).

११. **रिबॅगींग झालेल्या रिकाम्या गोणीतील साखर खरडून काढणे व बंडल बांधून थप्पी लावणे.**
**(प्रति १०० गोणीचा दर देणे.)** **(संपर्क :-चिफ केमिस्ट)**

**(संपर्क :-चिफ केमिस्ट)**

१२. मॅन्युफॅक्चरींग विभागाकडील--

**अ)** पॅन सफाई काम व

**ब)** कॉड्रीपल बॉडी व ज्युस हिटर सफाई कामाचे उक्ते दर देणे.

१३. शुगर हाउसमध्ये सायलो शुटला पी.पी.बॅग लावणे व शिलाई झाल्यानंतर आवश्यकता असल्यास बॅगचे ग्रेडप्रमाणे लॉट लावणे, तसेच ऑनलाईन गोडावूनला बॅग पाठविणे तसेच शुगर हाऊस मधील इतर सफाई कामे करणे. (प्रती पी.पी.बॅग दर देणे.) **(संपर्क :-चिफ केमिस्ट)**

१४. मॅन्युफॅक्चरींग विभागाकरीता प्रत्येक शिफ्टला **१२** मजूर पुरविणे. एकूण २४ तासाकरीता **३६ व** जनरल शिप्टमध्ये ३ असे एकुण ३९ मजूर पुरविणे. (२५% प्रॉ.फंड लागू) **(संपर्क :-चिफ केमिस्ट)**

१५. **कारखान्याचे मॅन्युफॅक्चरींग विभागातील निघणारे केमिकल बॉयलिंगचे पाणी टँकरमध्ये भरुन स्वतःचे मालकीच्या ट्रॅक्टरने कारखान्याचे आतील परिसरातील रस्त्यावर व ट्रकयार्ड आणि गाडी तळावर फवारणी करणे.** (प्रती ट्रीप दर देणे.) (कारखाना मालकीचा या कामी फक्त टँकर दिला जाईल.)
**(संपर्क :-चिफ केमिस्ट)**

१६. **कारखान्याचा इम्फ्ल्युएंट ट्रीटमेंट प्लॅन्ट (ई.टी.पी.) कंत्राटी पध्दतीने चालविणे.** **(संपर्क :-चिफ केमिस्ट)**
सिझन व ऑफ सिझनसाठी स्वतंत्रपणे कामाचा दर देणे.

१७. **बॉयलर इ.एस.पी,एअर हिटर,फर्नेस सबमर्ज अँश इत्यादी खालील कोरडी राख व सायलोमध्ये जमा झालेनंतर स्वत:चे वाहनाने उचलणे.**

बॉयलर इ.एस.पी, एअर हिटर, फर्नेस सबमर्ज अँशची राख अँश सायलोमध्ये गेल्यानंतर स्वत:चे वाहनाने भरुन तसेच बॉयलर खालील इ.एस.पी, एअर हिटर, फर्नेस सबमर्ज ठिकाणी सांडलेली कोरडी राख रोजच्या रोज स्वत:चे वाहनाने ताडपत्रीने झाकून कारखान्याचे वजन काटयावर वजन करुन स्वत:चे जागेत घेऊन जाणे. **सदरची राख अंदाजे ३० मे.टन** प्रतिदिन निघेल. परंतु ही राख कारखाना परिसरात साठविता येणार नाही. बॉयलर सबमर्जड अँश कनव्हेअर,एअर हिटर अँश कन्व्हेअर, ईएसपी बेल्ट कन्व्हेअर,खालील दररोज पडणारी लुज राख उचलून ट्रॉलीमध्ये टाकणे व बेल्ट कनव्हेअर रोलर क्लिनिंगकरुन रोलर जॅमिंग होणार नाही याची दक्षता घेणे.प्र.मे.टन खरेदीचा दर देणे.
**(टेंडर डिपॉझिट रु.२५,०००/-व जी.एस.टी. वेगळा आकारणेत येईल.)** **(संपर्क :-चिफ इंजिनियर)**

१८. **भुस्सा गाठी बांधणे ,भुस्सा यार्डात थप्पी लावणे,भुस्सागाठी बेलिंग पॉईंटवरुन व बगॅस यार्डातून लोडींग करणे.**
**(संपर्क :-चिफ इंजिनियर)**

अ) कारखाना मशिनवर **१x१x१.५ फुट** आकाराच्या गाठी बनवून ट्रकमध्ये (डायरेक्ट डिलेव्हरी) दर प्रती टनास देणे. दररोज किमान ३५० ते ४०० मे.टन बगॅस बेलींग करणे.

ब) कारखान्याच्या बेलिंग मशिनवर **१x१x१.५ फुट** आकाराच्या तयार झालेल्या गाठी स्वत:चे वाहनाने भरुन कारखान्याच्या वजन काटयावर वजन करुन बगॅस यार्डात वाहतुक करुन रोजच्या रोज थप्पी लावणे व ट्रॉलीतील लूज भुस्सा वजन करुन आरबीसी कॅरियर जवळ टाकणे (थप्पीची **साईज ३० फुट रुंदी x ३० फुट** उंची - दर प्र.मे.टन देणे) बगॅस यार्डात ट्रालीतील गाठी खालील लुज भुसा कोणत्याही परिस्थीत गाठी यार्डात टाकता येणार नाही.

क) बगॅस यार्डातून (पाटापलीकडील) विक्री केलेल्या भुस्सागाठी स्वत:चे मजुराने ट्रकमध्ये भरणे. (दर प्र.मे.टन देणे)

ड) कॅनॉलच्या पलीकडील बगॅस यार्डातून भुस्सागाठी व लुज भुस्सा स्वत:चे वाहनाने व स्वत:चे मजुरांकरवी भरुन वजन करुन आणून रिटर्न बगॅस कॅरियरला पुरविणे.
(दर प्र.मे.टन देणे)

इ) १. कारखान्याच्या **सन २०२३-२४** गळीत हंगामात आवश्यकतेनुसार बगॅस कॅरियरला भुस्सा पुरविणे.
२. गरजेनुसार बॉयलरचे फायरिंग फ्लोअरला लाकूड तसेच भुस्सागाठी पुरविणे व फर्नेसमध्ये फायरिंग करणे. यासाठी लागणारे पुरेसे मजूर आपणास हजर ठेवणे बंधनकारक राहील.
३. आर.बी.सी कॅरिअर जवळील भुस्सा मागे साठविणे व गरजेनुसार कॅरिअरमध्ये लोटणे. या कामासाठी लागणारे पुरेसे मजूर व ट्रॅक्टर केनी प्रत्यक्ष कामाच्या जागेवर हजर ठेवणे.
४. बगॅस यार्डमध्ये कारखाना बेलिंगमधून निघणा-या गाठी यार्डमध्ये दररोज व्यवस्थीत थप्पी लावणे. थप्पी दररोजच्या दररोज न लावल्यामुळे लूज भुस्साचे प्रमाण वाढते. कंत्राटदार यांनी तसे न केल्यास व लुज भुस्साचे प्रमाण वाढल्यास सदर ठिकाणचा लुज भुस्सा विक्री करुन विक्री केल्यानंतर सदर भुस्साची वजनाइतकी बेलिंगची मजुरी रक्कम कंत्राटदाराचे यांचे फायनल बिलातून वसूल करणेत येईल.

वरीलप्रमाणे अनुक्रमांक **इ** मधील कामांसाठी दिवसपाळी व रात्रपाळी (प्रती १२ तासाचे) मजूर पुरविण्याचे दर देणे. तसेच प्रत्येक पाळीत आर.बी.सी.कॅरियर वरील मजूर यांचे हजेरीची नोंद घेऊन शिप्ट इंजिनिअर यांचेकडून प्रमाणित करुन घेणे व सदरचे हजेरीपत्रक पंधरवाडा पगाराचे वेळेस इंजिनिअरींग ऑफिसला सादर करणे बंधनकारक राहील. सदर हजेरीप्रमाणेच पंधरवाडा बिल अदा करणेत येईल.

कारखाना सांगेल त्यावेळेस बगॅस यार्डातून किंवा बगॅस यार्डात थप्पीसाठी भुस्सा गाठींची वाहतूक करावी लागेल. त्यासाठी वाहनाची व मजूरांची स्वतंत्र व्यवस्था करावी लागेल.
(प्रॉव्हीडंड फंड नियमाप्रमाणे कपात करणेत येईल.)

१९. **केन अनलोडर चालविणेसाठी मजूर पुरविणे.** **(संपर्क :-चिफ इंजिनियर)**
कारखान्याच्या इंजिनिअरींग मिल विभागाकडील क्रेन अनलोडर साठी क्रेन ऑपरेटर पुरविणे.

१. आपणास प्रत्येक पाळीत ५ (पाच) याप्रमाणे दररोज तिन शिप्टमध्ये एकुण १५ क्रेन ऑपरेटर पुरवावयाचे आहे.
२. सदर ऑपरेटर यांना 'केन अनलोडर' चालविणेचा अनुभव असणे आवश्यक आहे.
३. केन अनलोडर चालवितांना ट्रक/ट्रॉली/जुगाड/बैलगाडी यांचे लाकडी डाम तुटणार नाही व वाहनांची इतर नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे.
४. केन अनलोडर चालवितांना अनलोडर काही इलेक्ट्रीक व मेकॅनिकल तांत्रीक बिघाड झाल्यास त्याची तत्काळ मिल फिटर/शिप्ट इंजिनिअर यांना कल्पना देवून सदर निघालेल्या कामास मदत करणे आपणास बंधनकारक राहील.
५. क्रेन ऑपरेटर यांना नेमून दिलेली क्रेन ऑपरेट करीत असतांना शिप्ट संपताना रिलिव्हर न आल्यास आपणास सदर जागा सोडता येणार नाही.
६. क्रेन कॅरीअर नं.१ (गव्हाण) पुर्ण क्षमतेने व गव्हाण जॅमिंग न होता कॅरिअर अखंड चालू राहील याची दक्षता आपणास घ्यावी लागेल.
७. कारखाना काही कारणास्तव बंद पडल्यास किंवा गव्हाण जाम झाल्यास क्रेन ऑपरेटर्स यांनी खाली येवून सदर कामासाठी मदत करावी लागणार आहे.

**२०. कारखान्याच्या इंजिनिअरींग विभागास साफसफाई व मिल गाळा तसेच कॅरियर साफसफाई उक्त्या पध्दतीने करणे.**

**केन कॅरियर, मिल गाळे, मिल हाऊस व पावर हाऊस इत्यादीचे कामे चिफ इंजिनियर यांचे सुचनेप्रमाणे करणे.**

**(संपर्क :-चिफ इंजिनियर).**

**२१. कारखाना उद्योग समुहास खाली नमुंद केल्याप्रमाणे पाणी पुरवठयाचे काम करणे.**

**(संपर्क :-चिफ इंजिनियर)**

कारखाना परिसरातील कॉलनी/ऑफिसेस /शाळा/इतर संस्था/मंदिर परिसर/पेट्रोल पंप/बगॅस यार्ड/उस तोडणी मजूरांसाठी / कारखाना सुचनेनुसार संपुर्ण उद्योग समुहास पिण्याचे व वापराचे पाणी पुरविणे तसेच किरकोळ पाईप लाईन व पंप दुरुस्तीचे काम उक्त्या पध्दतीने करणे.

**२२. कारखान्याचे सिझन २०२३-२४ करिता फिडर टेबल व टिल्टिंग टेबल २४ तास चालविणे.**
**(या कामासाठी प्रतिदिन उक्ते दर देणे.)**

**(संपर्क :-चिफ इंजिनियर)**

**२३. कारखान्याचे ५५० टायर बैलगाड्यांचे व १९८ ट्रॅक्टर टायर (जुगाड) चे दैनंदिन वेल्डींग करुन दुरुस्ती करणे. (संपूर्ण हंगामाकरिता दरमहाचा एकत्रित दर देणे) (संपर्क :- ट्रान्सपोर्ट सुपरिंटेंडेंट)**

**२४. कारखान्याचे ५५० टायर बैलगाड्यांचे व १९८ ट्रॅक्टर टायर (जुगाड) चे दैनंदिन रिपेअर मेन्टनन्सचे काम करणे. (संपूर्ण हंगामाकरिता दरमहाचा एकत्रित दर देणे) (संपर्क :- ट्रान्सपोर्ट सुपरिंटेंडेंट)**

**२५. कारखाना नर्सरी प्लॉट (शहाजापूर शिवारातील ) शेतीच्या उक्त्या कामाचे टेंडर (दरमहा एकत्रित दर देणे.)**

**(संपर्क :- ऊस विकास अधिकारी)**

कारखाना नर्सरी प्लॉट (शहाजापूर शिवारातील ) येथील गट नं.१०३,१०४,१०६,१०७,१२२,८४ व ९२ मधील वहितीचे क्षेत्र १५.३० एकर जमिनीतील ऊस किंवा इतर पिकास विहिरीचे व कॅनॉलचे पाणी भरणे व वेस्ट वॉटर ई.टी.पी. चे पाईप लाईनचे पाणी रात्रंदिवस भरणे, संपूर्ण क्षेत्राचे उभ्या पिकाचे, शेळीमेंढी संस्थेच्या शेडचे उपलब्ध साधन सामुग्रीचे रात्रंदिवस राखण करणे, दांड तासणे व इतर अनुषंगिक कामे करणे.

**२६. कारखाना पुरस्कृत कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर या संस्थेचे शेती कामाचे टेंडर प्रति महिना दराने देणे. (संपर्क :- ऊस विकास अधिकारी)**

कारखाना पुरस्कृत कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी, गौतमनगर या संस्थेचे नर्सरी प्लॉट (शहाजापूर शिवारातील) येथील गट नं.१२३,१२४,१२७,१२८,१३६/१,१३७,७४/३ मधील वहितीचे क्षेत्र १३.०० एकर जमिनीतील ऊस किंवा इतर पिकास विहिरीचे व कॅनॉलचे पाणी भरणे व वेस्ट वॉटर ई.टी.पी. चे पाईप लाईनचे पाणी रात्रंदिवस भरणे, संपूर्ण क्षेत्राचे उभ्या पिकाचे संस्थेच्या शेडचे इलेक्ट्रीक मोटार पंप व उपलब्ध साधनसामुग्रीचे रात्रंदिवस राखण करणे, दांड तासणे. तसेच इतर अनुषंगिक कामे करणे.

२७. कारखान्याचे डिस्टिलरी विभागाच्या नर्सरी प्लॉटवरील ३० एच.पी. पंप चालू करणे, पंपाने कॅनॉलचे पाणी व कारखाना वेस्ट वॉटर लाभधारक सभासद शेतकरी / संलग्न संस्थांना रात्रंदिवस वाटप करणे. पंपशेडचे राखण करणे तसेच मौजे कोळगांवमाळ येथील कंपोस्ट यार्ड जवळील क्षेत्रातील दैनंदिन होणारे शेती कामे मंजुरांकडून करुन घेणे व देखरेख करणे.

**(प्रति महिना एकत्रित दर देणे.)**
**(संपर्क :- ऊस विकास अधिकारी)**

<u>टिप :- वरील सर्व कामांसाठी</u>

१. वरील सर्व कामांचे टेंडर प्रत्येक अर्जासाठी **रुपये २००/-(अधिक जीएसटी १८ टक्के) असे एकुण रु.२३६/-** साखर कारखान्याचे अकौंट ऑफिसमध्ये कॅशियरकडे रोख भरावेत व रक्कम भरल्याची पावती जनरल ऑफिसमध्ये सादर केल्यानंतर विहित छापील नमुन्यातील टेंडर अर्ज मिळतील. प्रत्येक टेंडर करिता स्वतंत्रपणे अर्ज दयावा व टेंडर पाकीटावर कामाचा तपशिल व टेंडर घेणा-याचे नांव, पत्ता व मोबाईल नंबरचा उल्लेख करावा.

२. कामाबाबतचा सविस्तर तपशील टेंडर फॉर्ममध्ये नमूद केलेला आहे.

३. कंत्राटदार यांनी कंत्राटी कामाचे स्वरुप व त्याची करावयाची अंमलबजावणी याबाबतचा सविस्तर तपशील संबंधित खातेप्रमुख यांचेकडून समजावून घेऊनच टेंडर भरावे.

४. लेबर पुरविण्याचे टेंडर तसेच इतर कॉन्ट्रॅक्टचे काम मिळाल्यानंतर वरील कामासाठी तुम्ही जे कामगार कामावर नेमणार आहेत, त्यांची प्रॉ.फंड, फॅमिली पेन्शन व इतर चार्जेसची होणारी २५% रक्कम कामगार वर्गणी, मालक वर्गणी व इतर चार्जेसच्या रक्कमेसह तुम्हास भरावी लागेल. तसेच प्रॉ. फंडाचा कोड नंबर तुम्ही स्वतः प्रॉ. फंड कमिशनर ऑफिस, नाशिक यांचेकडून काम मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत घेणे आवश्यक आहे. तसेच मा.सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, अहमदनगर यांचेकडून कॉन्ट्रॅक्ट लायसेन्स रजिस्ट्रेशन व पूर्वीचे लायसेन्स असल्यास त्याचे नूतनीकरण करून घेण्याची जबाबदारी तुमची राहील. तसेच प्रॉ.फंडाचे मासिक व वार्षिक विवरण पाठविण्याची जबाबदारी तुमचेवर राहील.

वरील सर्व बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी तुमचेवर राहील. त्या अनुषंगाने कामगाराचे दैनिक वेतनाचे दर तसेच कामाचा दर नमूद करावा. एकदा काम घेतल्यानंतर व दर ठरल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत दर वाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच कामावर लावलेल्या कामगाराचा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कॉन्ट्रॅक्टर यांची राहील.

५. आपणांस कारखान्याचे **"क" वर्ग नाममात्र सभासद** व्हावे लागेल.

६. कामासाठी मजूर हे १८ ते ६० वयोगटातील असावेत.

७. आपणांस दिलेल्या कामाच्या होणा-या बिलातून कारखान्याचे धोरणाप्रमाणे **१०% डिपॉझिट** रक्कम कपात केली जाईल. सदर डिपॉझिट रक्कम हंगाम संपलेनंतर परत केली जाईल. तसेच आपल्याला दिलेल्या कामाबद्दल काही वाद निर्माण झाल्यास तो कोपरगांव येथील सहकार न्यायालयाचे कक्षेत सोडविला जाईल.

८. आपणांस काम मिळाल्यास आपला वैयक्तीक परमनंट अकौंट नंबर (पॅन कार्ड) अकौंट ऑफिसला दयावे लागेल. तसेच जी.एस.टी. कायदयानुसार टी.डी.एस. कपात करणेत येईल.

९. टेंडर मधील कामाचे वाटाघाटीसाठी **दि.२०/१०/२०२३ रोजी दुपारी २=०० वाजता** कारखान्याचे शेतकरी निवासमध्ये उपस्थित रहावे.

**एस.एस. कोल्हे**
**प्रभारी कार्यकारी संचालक**